महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल mahajyotingp@gmail.com

**जा.क्र.** महाज्योती, नागपूर/आस्था/2646/2023-24, **दिनांक** :-05/12/2023

## -:परिपत्रक:-

**विषय :- निवड यादीत नाव न आल्याने तक्रार नोंदवणेबाबत.**

महाज्योतीने नुकताच UPSC, MPSC (संयुक्त गट "ब" व "क") प्रशिक्षणाकरीता परीक्षा घेऊन निकाल जाहीर केलेला आहे. तथापि या निकालामध्ये काही विद्यार्थ्यांची नावे येऊ शकलेली नाहीत. याची कारणे खालील प्रमाणे दिसून येतात.

1) विद्यार्थ्यांने जातनिहाय प्रवर्ग न भरणे.
2) महिला उमेदवाराने अर्ज भरताना अर्जात स्त्री च्या ऐवजी पुरूष नमूद करणे. इ.
3) याशिवाय दुबार विद्यार्थी म्हणून काही विद्यार्थ्यांची नावे वगळण्यात आलेली आहेत.

याबाबत विद्यार्थ्यांची तक्रार अशी आहे की; त्यांची या प्रशिक्षणाकरीता निवड झाली होती परंतु त्यांनी प्रत्यक्षात प्रशिक्षणाचा लाभ घेतला नव्हता. महाज्योतीच्या स्तरावर या सर्व बाबींची पडताळणी करण्यात येत आहे. कोणतेही पात्र उमेदवारावर अन्याय होऊ नये, याची पूर्ण काळजी घेण्यात येत आहे. उमेदवाराचे म्हणणे योग्य आढळून आल्यास प्रतीक्षा यादीमध्ये उपलब्ध जागा विचारात घेऊन शक्यतोवर त्याचा नावाचा समावेश करण्यात येईल.

आतापर्यंत प्राप्त झालेल्या तक्रारींचे विवरण यासह जोडण्यात येत आहे. अशाच स्वरूपाची समस्या असेल आणि विद्यार्थ्यांनी ती समस्या महाज्योतीच्या निदर्शनास आणून दिलेली नसेल तर विद्यार्थ्याने अशी समस्या दि.08/12/2023 रोजी रात्री 11.00 वाजेपर्यंत अर्जाद्वारे, ई-मेल द्वारे किंवा 9975910394 या व्हाट्सअप क्रमांकावर महाज्योजीच्या निदर्शनास आणून द्यावी. विद्यार्थ्यांनी आपल्या तक्रारीची नोंद करत असताना आपला रजिस्टर मोबाईल क्रमांक, आपला बैठक क्रमांक तसेच रजिस्ट्रेशन क्रमांक न चुकता नमूद करावा. विहित मुदतीनंतर प्राप्त तक्रारींचा विचार केला जाणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

स्वा
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर